## जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301
Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 17.04.2020.

5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 19.04.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 28/04/2020.

**विषय:- कोरोना (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेली उस्मानाबाद जिल्हा सीमाबंदीचे उल्लंघन करुन अनाधिकृतपणे जिल्हयात प्रवेश करणा-या व्यक्तींवर कारवाई करणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने “महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020” प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून लॉकडाऊनचे कालावधीत संपूर्ण राज्यात जिल्ह्यांच्या सीमा/हद्दी बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 5 अन्वये या कार्यालयाने आदेश पारित केले आहेत. कोरोना (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयात अनाधिकृतरित्या प्रवेश करणा-या व्यक्तींना प्रतिबंध करणेसाठी उस्मानाबाद जिल्हयाच्या सीमांवर तसेच जिल्हयातील प्रत्येक तालुक्यांमध्ये आणि प्रत्येक शहरांचे सीमांवर चेक पोस्टची स्थापना करण्यात आलेली आहे. या चेक पोस्टवर पोलीस विभाग तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी यांचेकडून येणा-या/जाणा-या नागरिकांना विचारपूस करुन त्यांची माहिती घेण्यात येत आहे व इतर जिल्हयांतून अनाधिकृतपणे आलेल्या व्यक्तींना जिल्हयात प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तरीसुद्धा इतर जिल्हयांतून येणारे काही लोक अनाधिकृतरित्या छुप्या मार्गांचा अवलंब करुन उस्मानाबाद जिल्हयात प्रवेश करित असल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्याअर्थी सद्यस्थितीत उस्मानाबाद जिल्हयात आढळून आलेले कोरोना (COVID-19) चे रुग्ण बरे झाले असून जिल्हा कोरोनामुक्त झाला आहे. तथापि इतर जिल्हयांतून अनाधिकृतरित्या छुप्या मार्गांचा अवलंब करुन उस्मानाबाद जिल्हयात प्रवेश करणा-या नागरिकांमुळे जिल्हयात पुन्हा कोरोना संसर्गाचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उस्मानाबाद जिल्ह्यात करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **"उस्मानाबाद जिल्ह्यात ईतर जिल्ह्यातून अनाधिकृतरित्या प्रवेश केलेल्या केलेल्या व यापुढे येणा-या नागरिकांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देत आहे."**

1. **जिल्ह्यात अनाधिकृत प्रवेश करणा-या नागरिकांना 14 दिवस संस्थात्मक विलगीकरण (Institutional Quarantine) करण्यात यावे.**
2. **जिल्ह्यात अनाधिकृत प्रवेश करणा-या नागरिकांकडून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 चे कलम 51 मधील तरतुदीनुसार रु. 2000/- इतका दंड संबंधित तालुक्याचे तहसीलदार यांनी वसूल करुन ती रक्कम जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधीत जमा करावी.**
3. **जिल्ह्यात अनाधिकृतपणे प्रवेश करणा-या नागरिकांविरुद्ध पोलीस विभागाकडून गुन्हे दाखल करण्यात यावेत.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51, भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 मधील तरतुदींनुसार तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उस्मानाबाद.
8. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पंचायत सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

28/4/20

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner